# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-21.06.2026** **वार- रविवार**

---

**पाऊस**

पुणे आणि परिसरात आज दुपारी साडेतीन वाजल्यानंतर अर्धा तास वीजांसह पावसाच्या जोरदार सरी पडल्या. या बहुप्रतीक्षित पावसामुळं सर्वत्र गारवा आला. अजूनही पावसाची रिपरिप सुरू आहे.

पुढील आठवड्यातही असंच हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**सप-योग**

बाराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पुणे महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासन यांच्याद्वारे सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित भव्य योग कार्यक्रमात सुमारे ५ हजार नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

महापौर मंजुषा नागपुरे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत विद्यार्थी, युवक-युवती, महिला, ज्येष्ठ नागरिक, खेळाडू आणि विविध क्षेत्रातील नागरिकांनी एकत्र येत योगाच्या माध्यमातून आरोग्यदायी जीवनाचा संदेश दिला. तसंच योगाभ्यासातून निरोगी जीवनशैलीचा संकल्प केला.

मुख्य योग प्रशिक्षक मनाली देव यांच्या मार्गदर्शनाखाली ६० योग प्रशिक्षकांनी या सामूहिक योग प्रात्यक्षिकांचं सादरीकरण केलं.

**जिप-योग**

योग ही भारत देशानं जगाला दिलेली अमूल्य देणगी असून निरोगी आणि सशक्त समाज निर्मितीसाठी योगाभ्यासाचं महत्त्व समजून, प्रत्येक नागरिकानं दैनंदिन जीवनात योगाचा अंगीकार करावा, असं आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर रामचंद्र हंकारे यांनी केलं आहे .

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या मार्गदर्शनात, जिल्हा परिषद पुणे इथं आयोजित बाराव्या आंतरराष्ट्रीय योग दिवस कार्यक्रमात ते बोलत होते.

शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्य संवर्धनासाठी योगाभ्यास करणं गरजेचं असून नियमित योगाभ्यास केल्यानं, तणाव कमी होण्यासह कार्यक्षमता वाढण्यास तसंच आजारांपासून रक्षण होण्यास मदत होते, असंही डॉक्टर हंकारे म्हणाले.

योग प्रशिक्षक माधवी मागलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितांनी विविध योगासनं, प्राणायाम आणि ध्यानधारणा केली.

यावेळी पशुसंवर्धन उपायुक्त राजेश वासनिक, जिल्हा आयुष अधिकारी डॉक्टर मिलिंद चिद्दरवार, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक (आयुष) डॉक्टर शोएब इनामदार, जिल्हा विस्तार आणि माध्यम अधिकारी, कल्पना पंडित तसंच अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

**विद्यापीठ-योग**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये बारावा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यापीठातील खाशाबा जाधव क्रीडा संकुलाच्या अंतर्गत कक्षामध्ये आयोजित या सत्रामध्ये मान्यवर, तसंच विद्यापीठ विभागातील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान डॉक्टर विश्वनाथ पिसे यांनी एम.ए. योग अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांच्या सहाय्यानं उपस्थितांकडून विविध योगासनं आणि प्राणायामाची प्रात्यक्षिकं करून घेतली.

**योग**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आज पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग प्रशालेत झालेल्या योगासन प्रात्यक्षिकात, शिक्षण आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंह आणि शिक्षण उपसंचालक डॉक्टर गणपत मोरे यांनी सहभाग घेतला. प्रशालेचे माजी विद्यार्थी, योग प्रशिक्षक सिद्धार्थ बाबर यांनी विद्यार्थी तसंच उपस्थितांकडून योग प्रात्यक्षिकं करून घेतली. कोलकाता इथं झालेल्या मुख्य योग दिनाच्या कार्यक्रमातील माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाचं सजीव प्रसारण यावेळी करण्यात आलं.

पिंपरी चिंचवड महानगर पालिका शाळांमध्येही आज योगदिन उत्साहात साजरा झाला .

**जलसंधारण**

'एल निनो' च्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यात सुरु असलेल्या मृद आणि जलसंधारण कामांची प्रत्यक्ष पाहणी विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर यांनी आज केली.

मृद आणि जलसंधारणाची कामं गतीनं पूर्ण करण्याचे निर्देश त्यानी या वेळी दिले.

'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर भूजल पातळी वाढविण्याच्या दृष्टीनं मृद आणि जलसंधारण उपचारांची कामं पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचं उद्दिष्ट देण्यात आलं असून जिल्ह्यातील भूजल पातळी वाढीकरिता महत्त्वपूर्ण असलेली ही कामं दर्जेदार पद्धतीनं आणि गतीनं पूर्ण करावीत, असे निर्देश पापळकर यांनी दिले.

वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा कार्यालयात आयोजित आढावा बैठकीमध्ये जलस्रोतांचं संवर्धन, भूजल पुनर्भरण वाढविणं आणि भविष्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान, गाळमुक्त धरण- गाळयुक्त शिवार योजना तसंच प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत मृद आणि जलसंधारणाची कामं हाती घेण्याबरोबरच नवीन कामांचे प्रस्ताव सादर करावेत. अतिशोषित, टँकरग्रस्त गावांमध्ये भूजल पातळी वाढवण्यासाठीची कामं कमी कालावधीमध्ये पूर्ण करावीत, अशा सूचना पापळकर यांनी दिल्या.

**जर्मनी**

सांस्कृतिक आदान प्रदानाची 30 आणि मैत्री वृक्षाची 20 वर्षे असा सोहळा नुकताच कार्स्ट जर्मनी इथं पार पडला.

त्यासाठी पुण्यातील जर्मन भाषा अभ्यासक आणि प्रशिक्षक प्राध्यापिका डॉक्टर सविता केळकर, अंतरा मोडक, तुषार वरद हजर होते.

अल्बर्ट आईन्स्टाईन ग्युमनाजीयम या शाळेबरोबर हे सांस्कृतिक आदान प्रदान सुरू असून विद्यार्थी तसेच पालक आदान प्रदान होत आहे.

इंडिया युरोप बिझनेस डेस्क या सस्थेने त्यांचा Frank furt मधे या बद्दल गौरव केला.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**